*गुरुमाई चिद्विलासानंद यांच्या शिकवणी*

# श्रद्धा ठेवा

*भारतामध्ये सिद्धयोग संघम्‌करिता सत्संग*
*गुरुवार, ९ जुलै, २०२०*

*भगवान नित्यानंद मंदिर*

*'मंदिरात राहा' या सत्संगाचा शुभारंभ श्रीगुरुगीतेच्या पाठासह झाला. श्रीगुरुगीतेच्या पाठानंतर दिल्या गेलेल्या श्रीगुरुमाईंच्या शिकवणी :*

श्रीगुरुगीता! श्रीगुरुगीता!

श्रीगुरुगीतेचे पठण आपण सर्वांनी मिळून केले.

आजकाल तर मला विचारावे लागत नाही की, तुम्ही सर्वजण कसे आहात, कारण प्रत्येक देशाबद्दल न्यूज पेपरमध्ये बातम्या येतातच, मीडियात वाचायला मिळतेच. सारे लोक दुःखी आहेत.

तर मी कशी काय खुशाली विचारू? तथापि, मी विचारू तर शकतेच, "तुम्ही कसे आहात? तुम्ही सगळे ठीक आहात ना?" परंतु काय उत्तर मिळेल? कोणते उत्तर मिळेल? जर तुम्ही म्हणालात, "हो, आम्ही सगळे मस्त आहोत," तर मग मला विचार करावा लागेल, "तुम्ही कोणत्या ग्रहावर राहता?"

आजकाल जगात जे घडते आहे, जे चालले आहे, या रोगामुळे, या महामारीमुळे, त्यामुळे हे समजू लागले आहे की, कोण आपले आहेत, कोण जवळचे आहेत आणि कोण मतलबी लोक आहेत.

मला असे वाटत होते की, जेव्हा कधी कठीण समय येईल तेव्हा लोक एकत्र येतील, लोक एकत्र मिळून काम करतील, लोक *share* करतील. पण मला पाहायला मिळते आहे की, लोक स्वार्थी आहेत. लोक मतलबी आहेत.

जर साऱ्या जगाने एकत्र येऊन काम केले असते, तर आपण काय करू शकलो नसतो!

भगवंताने ह्या भूमीला आपल्यावर सोपवले; परंतु हिच्याबरोबर आपले जे नाते आहे, ते असे आहे ज्याला इंग्रजीमध्ये *question-worthy* म्हणतात. हा प्रश्न विचारावा लागतो की, आपले नाते काय आहे? आपला या भूमीशी काय संबंध आहे?

इथे अमेरिकेत मी पाहाते की, कोणी कोणाचे ऐकत नाही. डॉक्टर्स मरत आहेत, नर्सेस् मरत आहेत; पण जनतेला समुद्रावर जायचे आहे, त्यांना *bar*मध्ये जायचे आहे, त्यांना शॉपिंगला जायचे आहे, त्यांना फक्त मजा करायची आहे.

महामारीच्या काळात जेव्हा हजारो लोक मरत आहेत, तेव्हा ही मजा करायची गोष्ट लोकांच्या डोक्यात कशी काय येते? कशी?

आपल्यासाठी किती लोक आपला जीव गमावत आहेत. सैनिक जीव गमावत आहेत, शहीद होत आहेत. सैनिक कमीत कमी जीव गमावून शहीद तर होतात. असेच रोगामुळे मरण्याने आपण काय होतो?

या जगात रोगी बनून जगायचे आहे, की योगी बनून जगायचे आहे? हा एक महाप्रश्न आहे. जर योगी बनून जगायचे असेल, तर थोड्या दिवसांची जी मजा आहे, तिला एका बाजूला ठेवू शकता. तुमचे काय विचार आहेत?

म्हणूनच मी कसे काय विचारू शकते, “तुमची खुशाली काय आहे?”

एके दिवशी कोणीतरी मला सांगितले की, त्या व्यक्तीने पाहिले आहे की, लोक जेव्हा जिवंत असतात तेव्हा त्यांना कोणी विचारत नाही की, त्यांची खुशाली काय आहे? परंतु ते जेव्हा मरतात तेव्हा विचारणा होते, “ते कसे होते? त्या कशा होत्या? त्यांची काय परिस्थिती होती?” पण आपण तर धर्मसंकटात आहोत. आपण कसे विचारावे, “काय परिस्थिती आहे?”

जर योगी बनून जगत असाल, तर आपण विचारू शकतो, “आज तुम्ही किती आसने केलीत? आज ध्यान केले का? कोणाबरोबर चांगल्या प्रकारे बोललात का? आजची धून कशी होती? आई-वडलांची तब्येत कशी आहे?” परंतु जर तुम्हाला आपले जीवन मजेत घालवायचे असेल, तर अशा समयी आपण विचारू शकत नाही की, तुम्ही कसे आहात, कारण तुम्ही काय उत्तर देणार?

या महामारीमुळे जग एका अतिशय कठीण परिस्थितीतून जात आहे.

भारताच्या शास्त्रग्रंथांमध्ये बलिदानाविषयी सांगितले गेले आहे. हो, या समयी बलिदानाची गरज आहे. मजेची गरज नाही, बलिदानाची गरज आहे. शिस्तीची गरज आहे. एकमेकांबरोबर

आनंदाने बोलणे, एकमेकांची मदत करणे आणि राष्ट्रांचे नेतृत्वकर्ते जे सांगतील, ते ऐकण्याची गरज आहे.

इतके लोक आपला जीव गमावत आहेत, इतके लोक! का? मला नाही ठाऊक.

जे लोक कोणाचे सांगणे ऐकत नाहीत, त्यांचीसुद्धा डॉक्टर आणि नर्स देखभाल करतात. किती निःस्वार्थी आहेत हे डॉक्टर आणि नर्स! ही त्यांची महत्ता आहे. त्यांचे हृदय खूप मोठे आहे.

आपण सगळ्यांनी श्रीगुरुगीतेचे पठण केले, मिळून केले. खूपच सुंदर झाले. आणि तुम्हा सर्वांच्या हृदयात जो आनंद आहे, त्याचा अनुभव मलाही आला. म्हणूनच, तुमची काय खुशाली आहे, हे या वेळी मला विचारण्याची काही आवश्यकताच नाही, कारण मला तर ठाऊकच आहे.

तुम्ही श्रद्धेने पठण केले,
भक्तीने पठण केले,
खुशीने पठण केले,
कृतज्ञतेने पठण केले.
म्हणून श्रीगुरुगीतेचा पाठ खूपच सुंदर झाला. या शब्दांची किरणे तुमच्यासोबत आहेत आणि तुम्ही ती इतरांनाही देऊ शकता. जेव्हाजेव्हा तुम्ही अशा प्रकारे हात पुढे करून पसरवाल, तेव्हातेव्हा हातांद्वारे तुमच्या हृदयाची किरणे इतरांकडेही जातील. आपला संकल्प असा बनवा की, तुमच्यामुळे कोणीतरी हसावे, खुशीने हसावे, दिलखुलासपणे हसावे.

जेव्हा आपण श्रीगुरुगीतेचा पाठ केला तेव्हा त्यामध्ये आपण वारंवार पठण केले,
'तस्मै श्रीगुरवे नमः
तस्मै श्रीगुरवे नमः
तस्मै श्रीगुरवे नमः।'

आता मी 'गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णु' गाईन आणि त्याच्याबरोबरच तुम्ही सर्वजण 'तस्मै श्रीगुरवे नमः,' 'तस्मै श्रीगुरवे नमः,' 'तस्मै श्रीगुरवे नमः' गा.

श्रद्धा ठेवा. हिंमत असू द्या.

घाबरट—नाही.

भीती—नाही.

प्रेम—भरपूर.

ताकद—खूप.

लाज—नाही.

आत्मविश्वास— खूपच छान.

जसे प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींनी सर्वांना सांगितले,

“आत्मनिर्भर व्हा. सर्वजण आत्मनिर्भर व्हा.”

जेव्हा मी ही गोष्ट ऐकली तेव्हा मला खूप आवडली. आत्मनिर्भर, ज्याला इंग्रजीमध्ये म्हणतात *self-reliant*, हो.

हे पाहू नका की, कोण तुम्हाला किती खूश करेल. असा विचार करा, “मी यांना खूश करू शकतो का?” कारण लोक तर काहीही विचार करतात, काहीही करतात. मला महामारीच्या दरम्यान असेच पाहायला मिळते आहे.

लोक म्हणतात की सरकार जे सांगते आहे, ते मला करायचे नाही. अरे बाळा, सरकार तुमच्यासाठीच तर सांगते आहे ना? तुमचा जीव वाचवण्यासाठीच तर सांगते आहे ना? हे सर्व *experts* जी गोष्ट सांगतात, ती आपल्या सर्वांच्या भल्यासाठी आहे.

ही वेळ अशी आहे की, अपण गर्व दाखवू शकत नाही. श्रीगुरूंची पूजा करू शकतो. हो-हो! परंतु गर्वाची गरज नाही. इतक्या गर्वाची काय गरज आहे? इतक्या अभिमानाची काय गरज आहे?

सध्याच्या काळात, आपण प्रत्येकाबद्दल विचार केला पाहिजे, प्रत्येकाच्या भल्याचा विचार करायला हवा आणि चांगली कामे करायला हवीत.

आत्मनिर्भर.

अमेरिकेत म्हणतात,*"Fake News, Fake News, Fake News"* किंवा *"Alternate News, Alternate News, Alternate News."* बातमीलाही खोटे म्हणतात, वैकल्पिक म्हणतात. किती खोटेपणा

आहे ना? लोग फक्त दुसऱ्यांची खिल्ली उडवतात. स्वतःला मजा करायची आहे आणि दुसऱ्यांची खिल्ली उडवतात. ही काय मजा करण्याची आाणि मस्करी करण्याची वेळ आहे? नाही. नाही. नाही.

महामारीबद्दल आपल्या सगळ्यांना वेगवेगळी *information* मिळाली. कोणी म्हटले, "हे करू शकतो," कोणी म्हटले, "नाही करू शकत." कोणी म्हटले, "हे होऊ शकते," कोणी म्हटले, "नाही होऊ शकत."

सिद्धयोग पथावर एक गोष्ट जी निश्चित आहे, ज्यात काहीही संशय नाही, ती आहे श्रद्धा. काहीही झाले तरी तुम्ही आपल्या दृढ श्रद्धेला धरून राहू शकता, तिला आणखी सुदृढ होऊ देऊ शकता. तुम्हाला या गोष्टीची चिंता करण्याची गरज नाही की श्रद्धा बरोबर आहे की चूक, चांगली आहे की वाईट. श्रद्धेचे असणे एकदम योग्य आहे. श्रद्धा असेल, तर तुमचे भले होईल. हो.

भरवसा ठेवा. हिंमत असू द्या.
सर्वांबरोबर प्रेमाने बोला.
पाहा कोणाला मदतीची गरज आहे.
आणि स्वतःला खूप सांभाळा,
जेणेकरून जेव्हा पुढे कधी मी तुम्हाला विचारेन, "काय खुशाली आहे?" तेव्हा तुम्ही मला आनंदाने सांगू शकाल, की सारे काही छान आहे. मलाही त्याने आनंद मिळेल.

आज तुम्हा सर्वांबरोबर श्रीगुरुगीतेचा पाठ करून मला खूपच आनंद झाला, खूपच छान वाटले. भगवान नित्यानंदांच्या सन्मुख, या मंदिरात, श्रीगुरुगीतेच्या पाठाचा आरंभ करण्याच्या अगदी आधी आपण सगळ्यांनी संकल्प केला होता.

प्रत्येकाचा तो संकल्प फलद्रूप व्हावा, अशी माझी देवाकडे प्रार्थना आहे.

तुम्हाला भगवंताकडून काय भेट हवी आहे?
तुम्हाला भगवंताकडून कोणती भेट हवी आहे?
भगवंताकडे तुम्ही काय मागता?

जे काही मागाल, ते समजून-उमजून मागा. कारण आपण तर हे मानतो ना की, आपल्या जीवनात जे काही घडत असते, त्याबद्दल आपण कधी-ना-कधी संकल्प केलेला असेल. तर तो खरा होतो. मग आपण कितीही नशीबाला दोष दिला, आपण कितीही भाग्याला दोष दिला, आपण कितीही रडलो, तरी आपली समजूत काढणारे तर कोणी मिळणार नाही.

म्हणून, भगवंताकडे जेव्हा कधी काही मागाल, तेव्हा विचार करूनच मागा.

तुम्हा सर्वांबरोबर श्रीगुरुगीतेचा पाठ करून मला असे वाटते आहे की, आपण सर्वांनी गंगेत स्नान केले. एकदम शुद्ध, असा अनुभव येतो आहे. शुद्धतेचा अनुभव येतो आहे.

तर आता सिद्धयोग युनिव्हर्सल हॉलमध्ये आपण निरोप घेऊ या, पण हे लक्षात ठेवा,

हिंमत असू द्या, खूश राहा.
हिंमत असू द्या, खूश राहा.
हिंमत असू द्या, खूश राहा.

भगवंताने तुम्हाला खूप काही दिले आहे!

भगवंताने तुम्हाला खूप काही दिले आहे!

दररोज भगवंताला म्हणा,

“आपण मला खूप काही दिले आहे, सारे काही दिले आहे.
फक्त आपले प्रेम माझ्यावर राहावे
आणि माझे प्रेम आपल्या चरणांपाशी असावे.”

या जगात सगळ्यांबरोबर चांगल्या प्रकारे वर्तन करा.

भला विचार करा,
भले करा,
भले जीवन जगा.
नेहमी असा विचार करा,
“मला जगायचे आहे
गुरुकृपेच्या छत्रछायेत.”

माझी शुभेच्छा आहे की,

सर्वांची बुद्धी सदैव अनुकूल राहावी,
सदैव योग्य मार्गावर राहावी.

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.